**निशाणी क्र.२०**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास गैरअर्जदार क्र.१ करिता वकील श्री. विजय वानखेडे यांचेमार्फत</u>–**

२. मयत शुभम माझा मुलगा होता. मला अजुन एक मुलगा सोपान आहे. सोपानने पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. ट्रॅक्टर हा गैरअर्जदार क्र.२ च्या मालकीचा होता आणि त्यांच्याविरुध्द फिर्यादी दिली आहे, कारण ते गाडी चालवित होते. सोपान मजुरीचे काम करतो. खर्चामध्ये तो मदत करतो. मी मजुरीचे काम करीत नाही. मला महिना चार ते पाच हजार मिळतात. प्रिती डहाके माझी मुलगी आहे. तिचे लग्न १० वर्षांपुर्वीच झाले.

३. शुभम हा स्वत: गाडी चालवित होता. पल्सर गाडी शुभमची स्वत:ची होती. हे म्हणणे खरे नाही की, गाडीचा इन्शुरन्स नव्हता. इन्शुरन्सची कॉपी दाखल केली नाही. सदरची प्रत मी दाखल करेन. सुमन माझी पत्नी आहे, त्या मजुरीचे काम करतात. घरचा खर्च त्या करीत नाही. शुभम अपघाताच्या वेळी शिकत होता. तो नोकरीसाठी परिक्षा देत होता. हे म्हणणे खरे नाही की, तो कोणतेही काम करीत नव्हता. त्याला प्रत्येक आठवड्याला कामाचे पैसे मिळत होते. तो कुठे काम करीत होता हे मला माहिती नाही. घटनेच्या वेळेस मयत याने २६ वर्ष पुर्ण केले होते. हे म्हणणे खरे नाही की, अपघात शुभमच्या चुकिने झाला कारण तो वेगाने गाडी चालवित होता. अपघाताच्या वेळेस त्याने हेल्मेट घातले होते किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाढीव रक्कमेचा दावा दाखल केला आहे.

**<u>फेरतपास अर्जदारातर्फे वकिल श्री. आरीफ खान यांच्यामार्फत</u>–**

४. घटना माझ्यासमक्ष घडली नाही. दिनेश हटवार हे मालक होते म्हणून त्यांच्या नावाने तक्रार केली. पोलिसांनी तपास करून चालकाविरुध्द गुन्हा दाखल

केला.

<u>**फेरउलटतपास गैरअर्जदार क्र.१ करिता वकील श्री. विजय वानखेडे यांचेमार्फत–**</u>

५. ज्यांनी अपघात बघितला त्यांनी सांगितले की, दिनेश हटवार गाडी चालवित होते.

६. **<u>उलटतपास:–</u> गैरअर्जदार क्र.२ व ३ व त्यांच्या वकिलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर, करिता उलटतपास नाही.**

वा.दा.ब.अ.क. केले.

Digitally signed by BHARTI VASANT KALE
Date: 2026.06.20 17:28:26 +0530

(भारती काळे)
सदस्य
मोटार अपघात प्रधिकरण,
भंडारा.
दिनांक: २०/०६/२०२६

माझ्या समक्ष

Digitally signed by BHARTI VASANT KALE
Date: 2026.06.20 17:28:32 +0530

(भारती काळे)
सदस्य
मोटार अपघात प्रधिकरण,
भंडारा.
दिनांक: २०/०६/२०२६